**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस/ नागपुरातून नितीन गडकरी, रामटेकमधून राजू पारवे यांचे अर्ज दाखल
- लोकसभा निवडणुकांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची १७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर/ मुंबईतल्या काही जागा आणि सांगलीच्या उमेदवारीवरुन काँग्रेस नाराज
- वंचित बहुजन आघाडीकडून ९ उमेदवारांची घोषणा
- राष्ट्रीय तपास संस्थेच्या महासंचालकपदी सदानंद दाते यांची नियुक्ती

  **आणि**
- यंदाच्या मार्च महिन्यात भारतामध्ये आशियाई बाजारातली सर्वाधिक परदेशी गुंतवणूक

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. उद्या २८ मार्च रोजी उमेदवारी अर्जांची छाननी करण्यात येईल, तर ३० मार्च ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख आहे. बिहारमध्ये मात्र उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख २९ मार्च ही आहे.

निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या नागपूर, रामटेक, चंद्रपूर, भंडारा-गोंदिया आणि गडचिरोली-चिमूर या पाच लोकसभा मतदारसंघांमध्ये १९ एप्रिल रोजी  मतदान होणार आहे.

नागपूर लोकसभा मतदार संघामधून भाजपा तसंच महायुतीचे उमेदवार केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. रामटेक लोकसभा मतदारसंघातून शिवसेना आणि महायुतीचे उमेदवार राजू पारवे यांनी देखील आज आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. लोकसभा निवडणुकांच्या पहिल्या टप्प्यात लोकसभेच्या १०२ जागांसाठी १७ राज्यं आणि ४ केंद्रशासित प्रदेशांमध्ये निवडणुका होणार आहेत.

<><><><><>

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं आज १७ उमेदवारांची पहिली यादी जाहीर केली. पक्षासोबत असलेल्या जुन्या खासदारांना तसंच गेल्यावेळी पराभूत झालेल्या उमेदवारांना पक्षानं पुन्हा संधी दिली आहे. त्यामुळं दक्षिण मुंबईतून अरविंद सावंत, ठाण्यातून राजन विचारे, रत्नागिरी-सिंधुदुर्गमधून विनायक राऊत, उस्मानाबाद मधून ओमराजे निंबाळकर आणि

परभणीतून संजय जाधव पुन्हा पक्षाचे उमेदवार असतील. गेल्यावेळी पराभूत झालेल्या चंद्रकांत खैरे यांना औरंगाबादमधून, संजय दिना पाटील यांना ईशान्य मुंबईतून आणि अनंत गीते यांना रायगडमधून पक्षानं पुन्हा संधी दिली. वायव्य मुंबई मतदारसंघातले खासदार गजानन किर्तीकर एकनाथ शिंदे यांच्यासोबत गेल्यानं त्यांचा मुलगा अमोल किर्तीकर यांना पक्षानं तिकीट दिलं आहे. गेल्यावेळी शिवसेनेचे १८ खासदार निवडून आले होते. त्यात मुंबई दक्षिण मध्य, नाशिक, बुलडाणा, हिंगोली, शिर्डी, यवतमाळ-वाशिम, मावळ या मतदारसंघांचा समावेश होता. या मतदारसंघातले खासदार एकनाथ शिंदे यांच्यासोबत असल्यानं पक्षानं इथून नव्या उमेदवारांना संधी दिली आहे. दक्षिण मध्य मुंबईतून अनिल देसाई, नाशिकमधून राजाभाऊ वाजे, बुलडाण्यातून नरेंद्र खेडेकर, हिंगोलीतून नागेश पाटील-आष्टीकर, शिर्डीतून भाऊसाहेब वाकचौरे, यवतमाळ-वाशिम मधून संजय देशमुख आणि

मावळमधून संजोग वाघेरे- पाटील हे उद्धव ठाकरे यांच्यापक्षाचे उमेदवार असतील. सांगलीमधूनही पक्षानं चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर केली आहे.शिवसेनेच्या यादीवर काँग्रेसनं नाराजी व्यक्त केली आहे. मुंबईतल्या काही जागा, सांगली यावर चर्चा सुरू असताना उमेदवारी जाहीर करणं योग्य नसल्याची प्रतिक्रिया काँग्रेस विधीमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी दिली आहे.

**<><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडी पक्षानं ९ उमेदवार जाहीर केले आहेत. अकोल्यामध्ये मनोज जरांगे पाटील यांच्याबरोबर झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय झाल्याचं पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी बातमीदारांना सांगितलं. आगामी निवडणुकीत ओबीसी समुदायाबरोबर आघाडी होईल, तसंच मुस्लिम आणि जैन समुदायालाही उमेदवारी दिली जाईल असं ते म्हणाले. बाकी जागांची अंतिम यादी  २ एप्रिल पर्यंत  जाहीर होईल असं ते म्हणाले.

**<><><><>**

आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसनं उमेदवारांची सातवी यादी जाहीर केली आहे. पक्षानं छत्तीसगडच्या सुरगुजा मतदारसंघातून शशी सिंह, रायगड मतदारसंघातून डॉ. मेनका देवी सिंह, बिलासपूर मतदारसंघातून देवेंद्र सिंह यादव आणि कांकेर मतदारसंघातून बिरेश ठाकूर यांना उमेदवारी दिली आहे. तर आर. सुधा. तामिळनाडूतल्या मायिला-धुथु-राई इथून निवडणूक लढवणार आहेत.

**<><><><>**

भारतीय पोलीस दलाचे वरिष्ठ अधिकारी सदानंद दाते यांची NIA अर्थात राष्ट्रीय तपास संस्थेच्या महासंचालकपदी नियुक्ती झाली आहे. १९९० च्या तुकडीचे  भारतीय पोलीस सेवेतले हे अधिकारी सध्या महाराष्ट्र दहशतवाद विरोधी

पथकाचे प्रमुख म्हणून काम पाहत आहेत. मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं दाते यांच्या नियुक्तीला ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत अर्थात त्यांच्या सेवानिवृत्तीपर्यंतच्या कार्यकाळापर्यंत मान्यता दिल्याचं कार्मिक मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

यंदाच्या मार्च महिन्यात भारतानं आशियाई बाजारांमध्ये सर्वाधिक परदेशी गुंतवणुक आकर्षित केली आहे. परदेशी गुंतवणूकदारांनी डिसेंबर २०२३ नंतर केलेल्या सर्वात मोठ्या खरेदीत भारतीय समभागांमध्ये ३ अब्ज ६३ कोटी डॉलर्सची गुंतवणूक केली. तर देशांतर्गत गुंतवणूकदारांनी गेल्या चार वर्षांचा उच्चांक नोंदवत जवळजवळ ५२ हजार ४६७ कोटी रुपयांची गुंतवणूक केली. जागतिक भू-राजकीय आव्हानं आणि चढे व्याजदर आणखी काही काळ कायम राहण्याची चिंता, या पार्श्वभूमीवर हे यश उल्लेखनीय ठरलं आहे.

<><><><><>

सियुईटी- युजी- २०२४ साठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम तारीख ३१ मार्चपर्यंत वाढवली आहे. उमेदवार आणि इतर संबंधितांच्या विनंतीनंतर हा निर्णय घेतल्याची माहिती युजीसीचे अध्यक्ष एम. जगदेश कुमार यांनी दिली. ही परीक्षा ३८० शहरांमध्ये घेतली जाणार असून यामध्ये भारताबाहेरच्या २६ शहरांचा समावेश आहे.

<><><><><>

जपानचे ज्या देशांबरोबर संरक्षण करार झाले आहेत आणि ज्या देशांबरोबर त्यांचा कोणताही संघर्ष सुरू नाही अशा देशांना लढाऊ विमानं निर्यात करण्याचा निर्णय जपानच्या मंत्रिमंडळानं घेतला आहे. चीन आणि उत्तर कोरियामुळे निर्माण

झालेला धोका लक्षात घेता, स्वतःच्या सुरक्षिततेसाठी आपण हा निर्णय घेतल्याचं जपाननं म्हटलं आहे. तसंच ब्रिटन आणि इटलीच्या मदतीनं आपण नव्या विमानांची निर्मिती करत असून २०३५ पर्यंत ही विमानं तयार होतील असा विश्वास व्यक्त केला आहे.

<><><><><>

ब्राझिल आणि फ्रान्सनं ॲमेझॉनच्या रेनफॉरेस्ट अर्थात पर्जन्यवनात सुमारे १ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याचा निर्णय घेतला आहे. यात फ्रेंच गयानातल्या काही भागांचा समावेश आहे. रेनफॉरेस्टचं संरक्षण करण्यासाठी पुढच्या चार वर्षांसाठी हा निधी देण्यात येईल असं दोन्ही देशांनी काल एका संयुक्त निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

जम्मू, काश्मीर, लडाख, गिलगिट, बाल्टिस्तान, मुझफ्फराबाद, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये तुरळक ठिकाणी येत्या ३० मार्चपर्यंत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. पश्चिम हिमालयीन प्रदेश आणि लगतच्या वायव्य पठारी प्रदेशात पुढले पाच दिवस मेघगर्जनेसह पाऊस पडेल, तसंच या भागात पुढले दोन दिवस गारपीट आणि गडगडाटासह पावसाचा जोर वाढेल असा अंदाज आहे. याच काळात ईशान्य भारतात २६ ते ३० मार्च दरम्यान मेघगर्जनेसह जोरदार पाऊस पडेल, असा अंदाज आहे.

रायलसीमा, तामिळनाडू, पुडुचेरी, कराईकल, केरळ आणि माहे या ठिकाणी मात्र येत्या ३० मार्चपर्यंत उष्ण आणि दमट हवामान राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

<><><><><>

मियामी खुल्या टेनिस स्पर्धेमध्ये, रोहन बोपण्णा आणि मॅथ्यू एबडेन या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या जोडीनं पुरुष दुहेरी गटाच्या उपांत्य फेरीत प्रवेश केला आहे. त्यांनी उपांत्यपूर्व फेरीत नेदरलँडच्या सेम व्हर्बीक आणि ऑस्ट्रेलियाच्या जॉन-पॅट्रिक स्मिथचा ३-४, ७-५, १०-७ असा पराभव केला.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनराइजर्स हैदराबाद आणि मुंबई  इंडियन्स यांच्यात सामना होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय मैदानावर आज संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरुवात होईल.

//<><><><><>//